Shiksha Mandal's

# G. S. College of Commerce & Economics, Nagpur

An Autonomous Institution

(Affiliated to Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University)

First Semester Bachelor of Commerce Examination (CBCS)

## MARATHI

(BCL1.M)

Time: 3 Hours Maximum Marks: 80

---

प्रश्न १ खालील प्रश्नाचे उत्तर १५० ते २०० शब्दांत लिहा.

अ. स्वातंत्र्य समता व बंधुत्व या तिन्ही तत्वांची एकत्र जोपासना लोकशाहीला आवश्यक आहे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर का म्हणतात?

किंवा

राजर्षी शाहु महाराजांच्या सामाजिक कार्याचा आलेख शिवाजी सावंतांनी कसा चित्रित केला? ०८

ब. पु.भा.भावे लिखित 'नौका' या कथेच्या आधारे 'देबू'चे व्यक्तिचित्रण रेखाटा.

किंवा

डॉ. वि.स.जोग यांच्या 'उमा' या कथेचा सारांश लिहा. ०८

प्रश्न २

अ. खालील चार पैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ७५ ते १०० शब्दांत लिहा. ०८

१) 'पोळयाला पाटलाचा सजविलेला बैल आपण वेशीकडे घेऊन चाललो आहोत' असे विठोबाला का वाटते?
२) डॉ. आंबेडकरांचे जाती व्यवस्थे संदर्भातील धोरण विशद करा.
३) उमाचे स्वभावचित्र रेखाटा
४) हुगळी नदीचे वर्णन करा.

ब. खालील चार पैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन ओळीत लिहा. ०४

१) ''सत्यानाश, सर्वनाश होईल सगळ्यांचा ! एकही जण वाचणार नाही. एकही जण वाचणार नाही !'' असे देबू का म्हणतो?
२) प्रकाशने मामाला लग्नाला नकार का दिला?
३) सोनतळी कॅंपवरील प्रसंगाचे वर्णन करा.
४) उमाचा मृत्यू कसा झाला?

क. खालील सहा पैकी कोणत्याही चार म्हणी पूर्ण करा. ०४

१) देव देवळात ............
२) ज्याचं जळत ............
३) तोड दाबुन ............
४) हात फिरे ............
५) मायेवाचून रड नाही ............

६) उचलली जीभ ............

प्रश्न ३ खालील प्रश्नाचे उत्तर १५० ते २०० शब्दांत लिहा. ०८

अ. 'घनु वाजे घुणु घुणा' या कवितेतील आशयसौदंर्य उलगडून दाखवा.

किंवा

मानवी मनाच्या विविध भावावस्थांचा वेध बहिणाबाईंनी कसा घेतला आहे ते सांगा?

ब. खालील चार पैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ७५ ते १०० शब्दांत लिहा. ०८

१) गणपत वाण्याचे स्वभावचित्र रेखाटा.

२) कवी सुधाकर गायधनी यांनी शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे दर्शन कसे घडविले?

३) 'मालक असून झालो चोर' असे नारायण सुर्वे का म्हणतात?

४) ज्ञानदेवाच्या विराण्यातून विठठ्ल भेटीची तळमळ कशी व्यक्त झाली?

प्रश्न ४ खालील प्रश्नाचे उत्तर १५० ते २०० शब्दांत लिहा. ०८

अ. गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचे पैलू उलगडून दाखवा.

किंवा

गांधीजींनी कस्तुरबांवर स्वामित्व कसे गाजविले ?

ब. खालील चार पैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे ७५ ते १०० शब्दांत लिहा. ०८

१) चांगले अक्षर हे विद्येचे आवश्यक अंग आहे असे गांधीजी का म्हणतात?

२) गांधीजींना जातीबाहेर का काढण्यात आले?

३) सॉल्टचे पुस्तक वाचल्यानंतर गांधीजीच्या मनावर काय परिणाम झाला?

४) 'संकोचवृत्ती माझी ढाल होती' असे गांधीजी का म्हणतात?

प्रश्न ५ खालील दोन पैकी एका प्रश्नाचे उत्तर लिहा. ०८

अ. ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र लिहा.

किंवा

नवीन पासबुक मिळविण्याविषयी बँक व्यवस्थापकाला पत्र लिहा.

ब. खालील चार पैकी कोणत्याही एक विषयावर २५० ते ३०० शब्दांत निबंध लिहा. ०८

१) शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढते प्रमाण

२) स्त्रीभृणहत्याः गंभीर समस्या

३) सर्वधर्मसमभावः काळाची गरज

४) बालगुन्हेगारीची कारणे

***